संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

# उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना.श्री विनोद तावडे
# शैक्षणिक संस्थांच्या अध्यक्ष व सचिवांशी विद्यापीठात साधणार संवाद
# मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे विद्यापीठाचे आवाहन

अमरावती.

महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना.श्री विनोद तावडे हे दि. ०४ जानेवारी, २०१९ रोजी विद्यापीठातील डॉ.के.जी. देशमुख सभागृहात आयोजित ‘थेट संवाद मंत्र्यांशी’ या संवाद सभेत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या शैक्षणिक संस्थांचे अध्यक्ष व सचिवांशी प्रत्यक्ष संवाद साधणार आहेत. अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम या पाच जिल्ह्यांत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये सक्षमपणे कार्यरत असून शहरीसोबत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे निरंतरपणे कार्य करीत आहे. विद्यार्थ्यांना घडवण्यामध्ये महाविद्यालयांचा मोलाचा वाटा आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षण क्षेत्रात अग्रेसर आहे. शिक्षणक्षेत्राच्या भरीव योगदानासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेले आहेत. महाराष्ट्रातील विद्यापीठांमधून शिक्षण घेत असलेला विद्यार्थी जगाच्या कानाकोपऱ्यात महाराष्ट्र राज्याचे नांव उज्वल करीत आहे. शैक्षणिक क्षेत्रातील विकासात्मक कार्य व उपक्रमांबाबत ना.श्री विनोद तावडे हे शैक्षणिक संस्थांच्या अध्यक्षांशी संवाद साधत असल्यामुळे अनेक महत्वपूर्ण बाबींवर प्रकाश पडणार आहे. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्राचा विकास झपाट्याने होण्यामध्ये सर्वांच्या सांघीक प्रयत्नांना बळकटी येण्यास हातभार लागणार आहे.

दिनांक ०४ जानेवारी, २०१९ रोजी दु. २.०० वाजता विद्यापीठातील डॉ.के.जी. देशमुख सभागृहात आयोजित उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना.श्री विनोद तावडे यांच्या ‘थेट संवाद मंत्र्यांशी’ या संवाद सभेला पाचही जिल्ह्यांतील सर्व शैक्षणिक संस्थांच्या अध्यक्ष व सचिवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०१/०१/२०१९.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी